# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ३९ वा ❑ भारतीय सौर दिनांक २७ फाल्गुन शके १९४७, बुधवार दि.१८ मार्च २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### भारताला गॅसच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याची गरज

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

गॅस आणि ऊर्जा क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर अर्थात स्वावलंबी होण्याची गरज आहे. कारण देश एलपीजी गरजांपैकी ६०% ते ६५% आयातीवर अवलंबून आहे आणि मुख्यत्वे नैसर्गिक वायूवर. अलीकडील पश्चिम आशिया (इराण–इस्रायल) संकटासारख्या भू–राजकीय तणावामुळे पुरवठा खंडित होतो, त्याचा परिणाम सामान्य जनता आणि उद्योगांवर होत आहे.

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे भारताच्या गॅस स्वयंपूर्णतेची गरज अधोरेखित झाली आहे. भारत ६०% पेक्षा जास्त एलपीजी आणि मोठा नैसर्गिक वायू आयात करतो.मध्य पूर्वेतील तणावामुळे होर्मुज सामुद्रधुनीतून होणारा पुरवठा ठप्प झाल्याने, इंधन सुरक्षा आणि किंमतीतील अस्थिरता टाळण्यासाठी देशांतर्गत उत्पादन वाढवणे आणि स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहे.

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे भारताच्या गॅस स्वयंपूर्णतेची गरज अधोरेखित झाली आहे. भारत ६०% पेक्षा जास्त एलपीजी आणि मोठा नैसर्गिक वायू आयात करतो. मध्य पूर्वेतील तणावामुळे होर्मुज सामुद्रधुनीतून होणारा पुरवठा ठप्प झाल्याने, इंधन सुरक्षा आणि किंमतीतील अस्थिरता टाळण्यासाठी देशांतर्गत उत्पादन वाढवणे आणि स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहे.

भारताला गॅस स्वयंपूर्णतेची गरज का आहे? तर भारत आपल्या गरजेपैकी सुमारे ६०% एलपीजी आणि निम्म्याहून अधिक नैसर्गिक वायू आयात करतो, ज्याचा मोठा हिस्सा मध्य पूर्व देशांतून येतो. इराण, इस्रायल आणि अमेरिकेतील संघर्षासारख्या बाह्य परिस्थितीमुळे होर्मुज सामुद्रधुनीतून होणारा इंधन पुरवठा खंडित होऊ शकतो, सध्या गॅस चा पुरवठा खंडित झाला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील इंधनाचे दर वाढल्यास, देशात गॅस सिलेंडरचे दर भडकतात, ज्यामुळे महागाई वाढते. गॅसच्या तुटवड्यामुळे केवळ घरगुती स्वयंपाकच नाही, तर व्यावसायिक हॉटेल्स आणि विविध उद्योगांवरही परिणाम होतो.

सध्या मध्य पूर्वेतील इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील तणाव दिवसेंदिवस वाढत आहे. या वाढत्या तणावामुळे जागतिक बाजारपेठेत मोठी खळबळ उडाली आहे. जगातील खनिज तेल आणि गॅस वाहतुकीचा मुख्य मार्ग असलेली होर्मुझची सामुद्रधुनी युद्धजन्य परिस्थितीमुळे बंद झाल्याने भारताच्या एलपीजी आणि नैसर्गिक वायू पुरवठ्यावर विपरित परिणाम झाला आहे.

इराण–इस्रायलसारख्या पश्चिम आशियातील देशांमधील तणावामुळे जागतिक इंधन पुरवठ्यावर परिणाम होतो, याचा थेट फटका भारताच्या घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतींवर पडतो. मोठी आयात बिलामुळे परकीय चलनावर ताण येतो.कोळशाच्या तुलनेत नैसर्गिक वायू हे कमी कार्बन उत्सर्जन करणारे, स्वच्छ इंधन आहे, जे उद्योगांसाठी महत्त्वाचे आहे.भारत ,२०४७ पर्यंत ऊर्जा स्वतंत्र होण्याचे उद्दिष्ट ठेवून वाटचाल करत आहे.

भारताची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी या प्रकारची स्वयंपूर्णता असणे नितांत गरजेचे आहे.

काय करता येईल...

भारत शेल गॅसच्या उत्पादनासाठी ५६ प्रकल्प निश्चित करून नैसर्गिक वायूच्या शोधात आहे.

हरित ऊर्जा आणि हायड्रोजन रिलायन्स इंडस्ट्रीजसारख्या कंपन्या हायड्रोजन उत्पादनासाठी मोठी गुंतवणूक करत आहेत, जे भविष्यातील स्वच्छ इंधन ठरू शकते.

बायोगॅस आणि कचरा व्यवस्थापन: सांडपाणी आणि कचऱ्यातून)बायोगॅस निर्मितीवर भर दिला जात आहे.

बचत हीच निर्मिती: घरगुती पातळीवर गॅसची बचत करणे हा देखील स्वयंपूर्णतेच्या दिशेने एक महत्त्वाचा पाऊल आहे.

प्रधानमंत्री उज्ज्वला योजना अंतर्गत स्वच्छ इंधन पुरवठा ग्रामीण भागापर्यंत पोहोचवला जात आहे, ज्यामुळे घरगुती गॅसची मागणी वाढली आहे, त्यामुळे देशांतर्गत उत्पादन वाढवणे अपरिहार्य झाले आहे.

# ‘काळ्यानिळ्या रेषा’ला साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर

ज्योतिर्मय साहित्य

नवी दिल्ली : साहित्य अकादमीतर्फे देण्यात येणाऱ्या २०२५ या वर्षासाठी प्रतिष्ठेच्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आलीआहे. देशातील मान्यताप्राप्त २४ भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींना यंदाचे साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाले असून मराठी भाषेतील लेखक राजू बाविस्कर यांच्या ‘काळ्यानिळ्या रेषा’ या आत्मकथेसाठी हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

साहित्य अकादमी ही भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत स्वायत्त राष्ट्रीय संस्था असून भारतीय भाषांमधील साहित्याच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविते. दरवर्षी अकादमीकडून विविध भाषांतील उत्कृष्ट साहित्यकृतींची निवड करून त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

मराठी साहित्यविश्वात महत्त्वपूर्ण ठरलेल्या ‘काळ्यानिळ्या रेषा’ या आत्मकथेत लेखकाने आपल्या आयुष्यातील अनुभव, सामाजिक वास्तव, संघर्ष आणि वैचारिक प्रवास यांचे प्रभावी चित्रण केले आहे. या साहित्यकृतीला मिळालेल्या पुरस्कारामुळे मराठी साहित्यविश्वाचा गौरव वाढला आहे.

यंदाच्या पुरस्कारांमध्ये काव्यसंग्रह, कादंबरी, कथासंग्रह, निबंध, साहित्यिक समीक्षा, आत्मकथा आणि संस्मरण अशा विविध साहित्य प्रकारांतील विविध पुस्तकांची निवड करण्यात आली आहे. देशातील विविध भाषांमधील साहित्यिक परंपरेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या साहित्यकृतींना तज्ज्ञांच्या समितीद्वारे निवडण्यात आले आहे. मराठी भाषेच्या पुरस्कारासाठी नियुक्त परीक्षक मंडळामध्ये ज्येष्ठ साहित्यिक मंगला गोडबोले, नागोराव तम्माजी उटकर आणि राजन गवस यांचा समावेश होता.

साहित्य अकादमी पुरस्कारामध्ये मानचिन्ह, शाल आणि एक लाख रुपये रोख रक्कम देण्यात येते. २०२५ च्या साहित्य अकादमी पुरस्कारांचे वितरण ३१ मार्च २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित विशेष समारंभात करण्यात येणार आहे.


साहित्य अकादमी पुरस्कार २०२५-भाषा, पुस्तक व लेखक पुढीलप्रमाणे :

असमिया – कड़ि खेलर साधु (उपन्यास) – देवब्रत दास, बांगला – श्रेष्ठ कबिता (कविता) – प्रसून बंदोपाध्याय, बोडो दोंनै लामा : मोनसे गाथोन (उपन्यास) – सहायसुलि ब्रह्म

डोगरी –‘ठाकुर’ सतसई (कविता, दोहे) – खजूर सिंह ‘ठाकुर’, इंग्रजी – क्रिमसन स्प्रिंग (उपन्यास) – नवतेज सरना, गुजराती – भट्टखडकी (कविता) – योगेश वैद्य, हिंदी – जीते जी इलाहाबाद (संस्मरण) – ममता कालिया, कन्नड – दडा सेरिसु तंदे (कहानी) – अमरेश नुगडोणी, काश्मीरी – नजदावनेकी पॉट अलाव (कविता) – अली शैदा, कोंकणी – कोंकणी काव्यें : रुपां आनी रूपकां (आलोचनात्मक निबंध) –हेनरी मेंडोनका (एच.एम. पेरनाळ), मैथिली – धात्री पात सन गाम (संस्मरण) – महेन्द्र, मलयाळम् – मायामानुष्यर (उपन्यास) – एन. प्रभाकरन,

मणिपुरी – कंगलमद्रीब इफुत (कहानी) – हाओबम नलिनि, मराठी – काळ्यानिळ्या रेषा (आत्मकथा) – राजू बाविस्कर, नेपाली – नेपाली पारम्परिक, संस्कृति र सभ्यताको ढुकुटी (निबंध) – प्रकाश भट्टराई, ओड़िआ – पदपुराण (कविता) – गिरिजाकुमार बलियारसिंह, पंजाबी – सेफ्टी किट (कहानी) –जिंदर, राजस्थानी –भरखमा (कहानी) – जितेंद्र कुमार सोनी, संस्कृत – प्रस्थानचतुष्टये ब्रह्मघोष : (कविता) – महामहोपाध्याय साधु भद्रेशदास, संताली – मिड बिर्ना चेनने साओन इनाग सागई (कहानी) – सुमित्रा सोरेन, सिंधी – वाघू (कहानी) – भगवान अटलानी, तमिळ – तमिळ सिरुकथैयिन थडंगल (साहित्यिक आलोचना) – सा. तमिळसेलवन, तेलुगु –अनिमेष (कविता) – नंदिनी सिद्धरेड्डी, उर्दू –सफ़र जारी है (कविता) –प्रितपाल सिंह बेताब,

# देवाचं पाखरु – फुलपाखरू



ज्योतिर्मय साहित्य

आमच्या घराचं बांधकाम पूर्ण झालं आणि नव्या घरात राहायला गेलो तेव्हाची गोष्ट. जागा खूप कमी होती पण घराभोवती बाग असावी, असं मनापासून वाटत होतं. महिनाभरातच बागकाम सुरू केलं. अगदी कोणतं झाड कुठं लावायचं, खत कोणतं घालायचं, खताचं प्रमाण कसं असावं, त्याला सावली हवी की ऊन, पाणी किती घालायचं, ते झाड उंच किती जाईल, त्याची मुळं किती खोलवर जाणार, या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळवून प्रत्येक झाडासाठी जागा ठरवणं चालू होतं. त्यासाठी मी

बागकामाचा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या मैत्रिणी आणि नातेवाईकांना फोन करत होते. ही चर्चा कृष्णा कान देऊन ऐकत होता. पण त्याच्या मनात काही वेगळेच प्रश्न होते.

बीज रुजून, अंकुर फुटून, रोपानं तोंड वर काढलं आणि कृष्णाच्या प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली.

‘‘आई, तू इतकी झाडं का लावलीस?’’ या प्रश्नानं त्यानं सुरुवात केली. ‘‘आपल्या अंगणात छान छान रंगीबेरंगी फुलं असावीत, आपण लावलेल्या फळांच्या झाडाला आलेलं फळ खाण्याचा वेगळाच आनंद आपल्याला उपभोगता यावा, यासाठी ‘‘ यथामती मी उत्तर दिलं.

‘‘अजून काय फायदा होणार आपल्याला?’’ त्याचा पुढचा प्रश्न.

म्हटलं,’’ ही झाडं मोठी झाली की आपल्या अंगणात सावली असेल, उन्हाळ्यात फारसं उकडणार नाही, शिवाय त्यावर पक्षी गोळा होतील, चिमण्या येतील, फुलपाखरं येतील. पक्ष्यांचा किलबिलाट ऐकता येईल आपल्याला’’

‘‘चिमण्या आपल्या झाडावर घरटी बांधतील का गं आई?’’

अतिशय निरागस प्रश्न विचारला त्यानं.

म्हटलं, ‘‘नक्कीच बांधतील, पण जर आपण त्यांना त्रास दिला तर ते घरटं नाहीत बांधणार आपल्या झाडावर’’ मी सावधगिरीची सूचना केली.

त्याच्या प्रश्नांचा मारा सुरूच राहिला आणि मी काम करत राहिले. काही दिवसांनी बागेत मला एक सुरवंट दिसला. आता कृष्णाला काहीतरी वेगळं, चांगलं आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्याचं समाधान करणारं काही सांगता येणार आहे, याचा मला आनंद झाला. मी त्याला जवळ बोलावलं आणि सुरवंट दाखवला. त्यानं सुरवंट पहिल्यांदाच पाहिला होता, पण शाळेत तो शिकला होता की सुरवंटाचं फूलपाखरू होतं. आता त्या दिशेनं प्रश्न सुरू झाले.

आधी अंडी, मग अळी, कोष आणि सगळ्यात शेवटी फुलपाखरू हा क्रम त्याला माहीत होता. त्याच्या स्वतःच्या भाषेत तो मला तो क्रम सांगत होता. मग आता आपण या सुरवंटाचं निरीक्षण करायचं, नोंदी ठेवायच्या आणि फुलपाखरू कोणत्या दिवशी कोषातून बाहेर पडलं हेही बघायचं असं ठरलं. त्यादिवशी त्याला अंगणातून घरात आणायला मला फार कष्ट पडले. झोपताना त्यानं मला विचारलं, ‘‘आई, त्या कवितेतल्या सारखं आपलं फुलपाखरू या वेलीवरुन त्या वेलीवर उडणार का गं?’’

त्याला खात्री देता देता मला नाकीनऊ आलं.

ही सगळी प्रक्रिया तो जवळून बघत होता. त्या निरीक्षणात त्याला खूप आनंद मिळत होता. इतर कोणताही विषय त्याच्या डोक्यात येतच नव्हता. सुरवंट कोष कधी करणार, कोषातून बाहेर पडून फुलपाखरू कधी होणार, ते कोणत्या रंगाचं असेल, बाहेर पडल्यावर कोणत्या दिशेला उडेल? एक ना असंख्य.

काही दिवस उलटले आणि सकाळी सकाळी निराशा पदरी पडली. उठल्या उठल्या लगेचच शिरस्त्याप्रमाणे तो बागेत गेला आणि पाहतो तर काय? कोष रिकामाच. फुलपाखरु कधी उडून गेलं आम्हाला कळलंच नाही. आई, आपलं काय गं चुकलं? आई, तू सांगितलं होतं मला की काय काय बदल होतायत ते वहीत टिपून ठेव पण मी विसरलो, मी काहीच नाही लिहिलं. म्हणून असं झालं असेल का गं? आपण झोपेत असताना ते उडून गेलं का? मग आपण झोपायलाच नको होतं का? आई, फुलपाखरू म्हणजे देवाचं पाखरु ना? मग ते देवाकडेच गेलं असेल का? हा त्याचा प्रश्न




ऐकताक्षणी मला असं वाटलं, ‘‘ जीवनात ही घडी अशीच राहू दे ‘‘

पण या सगळ्या प्रश्नांची उत्तरं देताना माझी काय भंबेरी उडाली असेल, याचा अंदाज तुम्ही बांधू शकता.

मुलं अशीच असतात. मुलांची नैसर्गिक जिज्ञासा अशीच असते. घराभोवती झाडं लावण्याच्या साध्या कृतीकडेही कृष्णा वेगळ्या नजरेनं पाहत होता. ‘‘आई, इतकी झाडं का लावलीस?’’ हा प्रश्न साधा असला तरी त्यामागे सगळंच समजून घेण्याची इच्छा त्याची होती. मुलं नेहमी ‘‘का?’’ या प्रश्नाने सुरुवात करतात. कारण त्यांना प्रत्येक गोष्टीचा अर्थ समजून घ्यायचा असतो. मोठ्यांना जी गोष्ट साधी किंवा स्वाभाविक वाटते, ती गोष्ट म्हणजे मुलांसाठी एक नवीन शोध असतो.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे निरीक्षणातून शिकण्याची प्रक्रिया. सुरवंट दिसल्यानंतर कृष्णाची उत्सुकता अजून वाढली. अंडी, अळी, कोष आणि फुलपाखरू हा जीवनक्रम तो शाळेत शिकलेला होता, पण प्रत्यक्षात तो अनुभवण्याची संधी त्याला मिळाली तीही अंगणातल्या बागेतच. मुलांच्या शिक्षणात हा अनुभव खूप महत्त्वाचा असतो. पुस्तकात वाचलेली गोष्ट आणि प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेली गोष्ट यात मोठा फरक असतो. म्हणूनच सुरवंटाच्या कोषाकडे तो दिवसेंदिवस लक्ष ठेवून होता, नोंदी ठेवण्याची कल्पनाही त्याला आवडली होती पण बालसुलभ वयानुसार तो ते विसरला. मुलांच्या कुतूहलाला योग्य दिशा मिळाली तर ते शिकण्याचा आनंद स्वतः शोधतात.

मुलांचं भावविश्वही किती कोमल असतं ना?. फुलपाखरू कधी बाहेर पडेल याची कृष्णाला इतकी उत्सुकता होती की त्याच्या मनात सतत तेच विचार होते पण जेव्हा त्यानं बघितलं की कोष रिकामा आहे आणि फुलपाखरू उडून गेलेय, तेव्हा त्याला निराशा आली. ‘‘आपलं काय चुकलं?’’ किंवा ‘‘आपण झोपलो म्हणून ते उडून गेलं का?’’ असे प्रश्न त्यानं विचारले. या प्रश्नांमध्ये त्याच्या मनातला निरागस अपराधीपणा आणि प्रामाणिक भावना दिसत होती. त्याला वाटतं होतं की प्रत्येक घटनेत आपला काहीतरी सहभाग असायला हवाच.

यातून आणखी एक महत्त्वाची गोष्ट समोर येते. कृष्णाच्या प्रश्नांना उत्तर देणं हे माझ्यासाठीही शिकण्याची संधी होती. मुलं अचानक असे प्रश्न विचारतात की मोठ्यांनाही क्षणभर उत्तर सापडत नाही. पण हाच संवाद मुलं आणि पालक यांच्यातील नातं अधिक समृद्ध करतो. मुलांची जिज्ञासा जपली तर त्यांच्या विचारशक्तीचा विकास होतो.

एकंदरीत, निसर्ग हा मुलांसाठी आणि आपल्या सर्वांसाठीच सर्वात मोठा शिक्षक असतो. झाडं, सुरवंट, कोष आणि फुलपाखरू या साध्या गोष्टीतूनही मुलं जीवन, बदल आणि स्वातंत्र्य याबद्दल शिकत असतात. ‘‘असं का?’’ या सदरासाठी हा अनुभव महत्त्वाचा आहे, कारण या प्रसंगातून आपल्या लक्षात येतं की मुलांच्या प्रश्नांना मर्यादा नसतात आणि त्या प्रश्नांतूनच त्यांची समज, संवेदनशीलता आणि विचार करण्याची क्षमता विकसित होत असते. या सुरवंटाचं झालेलं फुलपाखरू कधी उडून गेलं त्याला कळलं नाही पण त्याला या प्रसंगातून मिळालेलं ज्ञान आता तो कधीही विसरणार नाही, याचं समाधान मला आजही सुखावतं.

**


Happy Birthday

॥ज्योतिर्मय॥

गुढीपाडव्यापासून आपण ज्योतिर्मय दैनिकात वाढदिवसाच्या शुभेच्छा जाहिराती सुरु करीत आहोत, आपल्या घरातील मुलांचे किंवा मुलींचे वाढदिवस शुभेच्छारुपी जाहिराती मधून साजरे करणार आहोत.

शुभेच्छा दिल्याने प्रेम वाढते, आपुलकी वाढते तसेच आनंदी वातावरण निर्माण होते.

सर्वांना ही कल्पना निश्चित आवडेल असे मला वाटते.

त्याकरिता नाममात्र शुल्क असणार आहे.

- 15 वर्षाच्या आत असेल तर फक्त 100 रुपये
- 15 वर्षावरील व्यक्तीस फक्त 300 रुपये.
- जाहिरातीचा मॅटर व पैसे वाढदिवसाच्या दोन दिवस अगोदर पाठविणे.
- डिझाईन करून पाठविले तरी चालेल, किंवा मॅटर व्हाट्सअप वर पाठविणे, मॅटर लिमिटेड असावा.
- जाहिरातीचे पेमेंट 7743918559 या नंबरवर ऑनलाईन पाठविणे.
- काही शंका असेल तर 7743818559 या नंबरवर फोन करणे.
- पुण्यस्मरणची जाहिरात पण फक्त 100 रु.मध्ये प्रकाशित केली जाईल.

जाहिरात व्यवस्थापक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे



## जात्यावरच्या ओव्या......

मन वारुळांची मुंगी
एका रांगेत चालती
जीवाहुन जड ओझ
कश्या पायी उचलती? ||५४८||

मन बारूळ, बाजींद
ह्याला घालावा लगाम
याच्या मनमानी पायी
झाली दुनिया हराम ||५४९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७-८

ज्योतिर्मय साहित्य

या श्लोकात समर्थांनी धैर्य, संयम, नम्रता आणि गोड बोलणे ही आपल्या जीवनाला दिशा देणारी चतु:सूत्री दिली आहे. ती आपण लक्षात घ्यायला हवी.

स्वसंवाद : संकटसमयी माझे मन स्थिर राहते का, की लगेच खचते ?

टीका झाली तर मी संतुलित राहू शकतो का ?

माझ्या वागण्या, बोलण्यात नम्रता आणि सौजन्य आहे का ?

माझ्या बोलण्याने लोक संतुष्ट होतात का ?

देहे त्यागिता कीर्ति मागे उरावी ।
मना सज्जना हेची क्रीया धरावी ।
मना चंदनाचे परी त्वां झिजावे ।
परी अंतरी सज्जना नीववावे ।८।

अर्थ : हे मना ( सज्जन माणसा ), तुझी वागणूक अशा प्रकारे असू दे की मृत्यू पावल्यानंतरही तुझी कीर्ती मागे राहील. सुगंध देण्यासाठी चंदन ज्याप्रमाणे स्वतःला झिजवते अशाच प्रकारे तू देखील इतरांसाठी झिजून सज्जनांना संतोष होईल अशा प्रकारे वागावे.




माणसाचा देह नाशिवंत आहे. जो जन्माला आला त्याला एक दिवस मृत्यू निश्चित आहेच. जीवन आणि मृत्यू यांच्या दरम्यानचा कालावधी म्हणजे आपले आयुष्य. एखादी व्यक्ती किती जगली यापेक्षाही ती कशी जगली हे अधिक महत्त्वाचे. शंभर वर्षांचे दीर्घायुष्य मिळवून आपले आयुष्य मौजमजेत घालवणाऱ्या व्यक्तीपेक्षा अल्पायुष्य लाभलेल्या परंतु इतरांच्या सेवेत आपले जीवन घालवणाऱ्या व्यक्तीचे जीवन कधीही श्रेष्ठ ! स्वामी विवेकानंदांना उणेपुरे चाळीस वर्षांचे आयुष्य लाभले परंतु या आयुष्यात त्यांनी जी मानवतेची सेवा केली ती अनेक जन्म घेऊनही इतरांना करणे कठीण आहे. आपले आयुष्य सत्कारणी लावायचे असेल तर त्यासाठी इतरांसाठी झिजण्याची तयारी हवी. एक सुंदर मराठी गीत आहे...

आनंद या जीवनाचा, सुगंधापरी दरवळावा
गाण्यातला सूर जैसा ओठांतुनी ओघळावा
झिजूनी स्वतः चंदनाने
दुसऱ्यास मधुगंध द्यावा...


शीतलता आणि सुगंध हे चंदनाचे गुण आहेत. ते इतरांना देण्यासाठी ते स्वतः झिजत असते. चंदन रोज सहाणेवर थोडे थोडे उगाळले जाते. असे करताना त्याची झीज होत असते. परंतु ही झीज सोसून ते इतरांना सुगंध आणि शीतलता प्रदान करते. आपण असेही म्हणतो की जे हात इतरांना सुगंध वाटतात, त्या हातांनाही सुगंध येतो. तो गंध त्यांना आपोआप प्राप्त होतो.

(क्रमशः)









## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## श्रवणनाम निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

दशक-७
समास-९
नमस्कार

भगवंताची प्राप्ती होईल ह्या उदात्त हेतूने साधना करावी. गीतेतील श्लोक सांगतात की फळाची अपेक्षा करू नये

म्हणून जेवढे ज्ञान पदरात पाडून घेता येईल तेवढे घ्यावे काय आणि कसं द्यायचं हे भगवंत बघेल.


आत्मज्ञान वाढवण्यासाठी ग्रंथ वाचावेत. ज्याला आत्मकल्याण साधायचे आहे त्याने सतत अद्वैत ग्रंथ वाचावेत. त्यासाठी शांत आणि एकांताची जागा निवडावी. त्यामुळे मन एकाग्र होईल.

प्रापंचिक विषयातील ग्रंथ हास्य,विनोद,विज्ञान विषयक माहिती,खगोलीय अभ्यास, गणित विज्ञान विषयक माहिती यासाठी जसे उपयोगाचे आहेत . पण परमार्थ मार्गात संतांचे ग्रंथ जास्त उपयुक्त असतात. की ज्यांचे पूर्ण समजून घेऊन पुनश्च वाचले की आपले मन शांत होते. परमार्थ वाढतो. त्याच्या अंगी अनुताप उत्पन्न होऊन ,मन शुद्ध होते. दोष सुधारतात. अधोगती टळते.

परिशीलनाने विरक्ति येते. आचारविचार सामर्थ्य प्राप्त होते. परोपकार करावासा वाटतो. स्वतः पुरती बघण्याची दृष्टी संपते,

हा समाज माझा आहे.

यातील वाईट दुर्गुणाचा नाश केला पाहिजे. सद्गुणांची सात्विकता जोपासा पाहिजे. ती वाढवली पाहिजे अशी तळमळ मनामध्ये निर्माण झाली की समजावे संत साहित्याचे अभ्यासक म्हणवून घ्यायला पात्र आहेत. जो ग्रंथ वाचला असतां माणसाला परमार्थ साधना समजते. ग्रंथांच्या नित्य सहवासाने साधकाला आत्मज्ञान प्राप्त होते. जीवन कृतकृत्य झाल्यासारखे वाटते ते खरे ग्रंथ होय. (क्रमशः)



### श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नाम व भगवंत

ज्योतिर्मय साहित्य

'राम राम' म्हणून राम कसा भेटेल या विचारण्यात काहीच अर्थ नाही. उलट असे म्हणता येईल की, 'राम राम' म्हटल्याशिवाय राम भेटणेच शक्य नाही. व्यवहारातही आपला हाच अनुभव आहे. समजा, आपल्याला एका गावाला जायचे आहे म्हणून आपण स्टेशनवर गेलो, आणि जिथे जायचे आहे त्याचे सर्व वर्णन केले पण नाव सांगता आले नाही, तर आपल्याला तिकीट मिळेल का ? उलट, त्या गावातली काही माहिती नाही पण नाव ठाऊक आहे, तर आपल्याला तिकीट मिळून तिथे जाता येईल. म्हणजे, ठिकाण माहितीचे आहे पण नाव तेवढेच न आठवले तर काहीही उपयोग होत नाही. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, बाकी सर्व केले पण नाम नाही घेतले तर काही उपयोग होत नाही; म्हणून नाम घेणेच जरूर आहे. नामाने भगवंताची प्राप्ती होणार ही खात्री असावी.

भगवंताच्या नामाची गरज दोन तऱ्हेने आहे : एक, प्रपंचाचे स्वरूप कळण्यासाठी, आणि दुसरी, भगवंताच्या प्राप्तीसाठी. खायला-प्यायला पोटभर, बायकोमुले, घरदार, वगैरे सर्व गोष्टी असल्या तरीसुद्धा आपल्याला काळजी आणि तळमळ का असते हे आपल्याला कळत नाही. याचा अर्थ, दु:खाचे खरे स्थान कुठे आहे हे कळत नाही. ते कळण्याकरिता भगवंताच्या नामाची गरज आहे. भगवंताची तळमळ लागेपर्यंत नामाची जरुरी आहे; नंतर, भगवंतावाचून आपल्याला दुसरा आधार नाही म्हणून नाम घ्यायला पाहिजे; आणि शेवटी, भगवंताच्या दर्शनानंतर नाम सवयीने आपोआप येते. एकूण, आरंभापासून शेवटपर्यंत भगवंताचे नामच शिल्लक राहते. जो नामस्मरण करील आणि त्याचे अनुसंधान ठेवील त्याला भगवंताची जिज्ञासा आपोआप उत्पन्न होईल. नामाकरिता नाम घ्या, की त्यात राम आहे हे कळेल. नाम घेताना, जे घडेल ते चांगले आणि आपल्या कल्याणाचे आहे असा भरवसा ठेवा.

भगवंताचे नाम हीच सच्चिदानंदस्वरूप सद्वस्तू होय. भगवंताच्या नामात जो स्वत:ला विसरला तो खरा जीवन्मुक्त होय. जे काय साधायचे ते हेच. बाकीच्या गोष्टी स्वप्नासारख्या समजाव्यात. त्या प्रचीतीस येतात पण नसतात. देहाशी असलेले आपले तादात्म्य हे एक प्रकारच्या सवयीने आणि अभ्यासानेच झालेले आहे. याच्या उलट अभ्यास करून भगवंताचे चिंतन केले तर जसे आज देहाशी तादात्म्य आहे त्याचप्रमाणे भगवंताशी आपले तादात्म्य होईल. सकाळी उठताना, रात्र निजताना, जेवायच्या आधी, नाम घ्यायचेच आणि भगवंताची आठवण करायचीच असा नियम करावा. तो आयुष्यात फार उपयोगी पडेल.



## श्री संत ज्ञानेश्वर
### अभंग व अर्थ

पुढे......

वडील निघून गेले. धुंधूकारीला रान मोकळे झाले. आईस त्याने खूप त्रास दिला. आईने कंटाळून विहिरीत उडी मारली. मग त्याने वेश्शा घरात आणल्या. याचे धन सरले. धुंधुकारी चोऱ्या करू लागला. शेवटी त्या वेश्यांनी त्याला मारले. तो प्रेत योनीतून भूत योनीत अडकला. इकडे गोकर्ण ज्ञान संपादन करून घरी आला. गोकर्णाने घराची झालेली वाताहत पाहिली व आपला भाऊ धुंधूकारी हा भूत योनीत असल्याचे जाणले. तो धुंधूकारीस म्हणाला तू भूत योनीत कसा अडकला ? मी तर गया येथे तुझे श्राद्ध घातले होते?.

यावर धुंधुकारी म्हणाला "मी इतकी पापे केली आहेत की, अशा कितीही श्राद्धांनी कांहीं होणार नाही.

शेवटी गोकर्णाने सूर्य देवास विचारले, त्यावर त्यांनी गोकर्णास भागवत करण्यास सांगितले. धुंधुकारी भूत योनीत वेळूच्या गाठींत बसला होता. तो वेळू कथा मंडपात समोर ठेवलेला होता. गोकर्णाने कथा सांगितली व ती धुंधूकारीने मन लावून ऐकली. त्या वेळुची रोज एक एक ग्रंथी फुटून भूत मुक्त झाले. त्यास न्यायला देवांचे विमान आले. त्यावेळी गोकर्णाने विमानातील दूतास विचारले? ही कथा सर्वांनी श्रवण केली मग हा एकटाच का मुक्त झाला? त्यावर दूत म्हणाले,ही कथा सर्वांनी ऐकली पण या कथेचे मनन याने एकट्यानेच केले. श्रोते 2 प्रकाराचे असते अवर श्रोता व प्रवर श्रोता. अवर श्रोता कनिष्ठ दर्जाचा असतो. भुरुंड नावाचा एक पक्षी आहे तो दुसऱ्याला शिकार करू देत नाही पण गुपचूप स्वत: करतो, वरून तो अहिंसावादी वाटतो, पण त्याचे जवळ आतून हिंस्त्रता असते. यावरून भारुड हा शब्द तयार झाला. वरचा अर्थ वेगळा व आतला अर्थ वेगळा.

श्रवण कसे करावे? यासाठी दुसरा स्कंद पहावा लागेल. पुढील उद्याच्या अंकात........



## आरोग्य संजीवनी

## झोपण्याअगोदर का दूध प्यायला हवेच

ज्योतिर्मय साहित्य

खूप स्त्रियांना आणि आईंना दूध आवडत नसते. पण काही मातांना ते आवडत असते. पण दूध हे आवडत असेल किंवा नसेल तरीही प्यायला हवे. कारण दूध हे शाकाहारी आहे आणि खूप काही पौष्टिक घटक त्यातून मिळत असतात. त्यामुळे तुमचे शरीर तर सशक्त होतेच पण होणाऱ्या किंवा झालेल्या बाळाला खूप लाभदायक आहे. ह्यातून तुम्हाला खूप सारे पौष्टिक घटक मिळतात. लहान बाळासाठी पूर्णान्न असलेले दूध. दुधात आयर्न, मॅग्नेशियम, मँगेनीज, तांबे, पोटॅशियम, सेलेनियम, झिंक, फॉस्फरस ही खनिजे उत्तम प्रमाणात उपलब्ध असतात. एक कप जरी दूध घेतले तरी तुम्हाला त्यातून १३० कॅलरीज मिळतात.

शांत व गाढ झोप लागण्यासाठी कोमट दूध घेतलेले बरे. कोमट दूध प्यायल्याने खूप गाढ झोप लागत असते. पण ह्यासोबतच इतरही फायदे तुम्हाला मिळतात ते ह्या माहितीमधून बघू.

रात्री झोपताना दूध प्यायले तर तुमचे पोट भरलेले राहते आणि तुम्हाला लवकर भूक लागत नाही. त्यामुळे तुम्हाला वजन कमी करायचे असल्यास रात्री झोपताना दूध पिणे हा उत्तम पर्याय ठरु शकतो.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

प्रक्रिया केलेले दूध पिणे जास्त चांगले.

कोमट दूध प्यायल्याने शरीरातील स्नायू शिथिल होण्यास मदत होते. स्नायू शिथिल झाले की शांत आणि चांगली झोप लागते. त्यामुळे झोपण्यापूर्वी कोमट दूध पिणे गाढ झोप लागण्यासाठी उपयुक्त असते. आणि ॲसिडिटी वरती थंड दूध खूप लाभदायक ठरत असते.


दूधामध्ये असणाऱ्या पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. रक्तदाब नियंत्रित राहील्यास हृदयावर ताण येत नाही आणि हृदयाशी संबंधित तक्रारी उद्भवण्यापासून आपली सुटका होऊ शकते. आणि जर तुम्हाला खोकला किंवा कफ किंवा सर्दीही असेल तर तुम्ही आयुर्वेदाप्रमाणे दूधामध्ये हळद टाकून दूध प्यायला हवेच. आले टाकून प्यायल्यास प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. विविध कारणांनी होणाऱ्या व्हायरल इन्फ `क्शनपासून शरीराचे संरक्षण करण्यासाठी हे उपयोगी ठरते.

## आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495





वेताळ कथा ६

एकदा एका नगरात एक अतिशय विद्वान ब्राह्मण राहत होता. त्याला एक सुंदर आणि बुद्धिमान कन्या होती. तिच्या सौंदर्याबरोबरच तिच्या बुद्धीचीही सर्वत्र ख्याती होती.

ती कन्या साध्या पुरुषाशी विवाह करणार नव्हती. तिने ठरवले की तिचा विवाह अशा पुरुषाशीच होईल जो खरोखर विद्वान आणि गुणी असेल. तिच्या विवाहासाठी तीन तरुण पुढे आले. तिघेही स्वतःला अत्यंत विद्वान समजत होते.

पहिला तरुण म्हणाला की त्याला शास्त्रांचे अद्भुत ज्ञान आहे.

दुसरा म्हणाला की त्याची बुद्धी आणि तर्कशक्ती अतिशय प्रखर आहे.

तिसरा तरुण मात्र शांत होता. तो आपल्या ज्ञानाचा गर्व करत नव्हता.

एके दिवशी त्या नगरात एक मोठा वाद उद्भवला. त्या वादाचा निर्णय देण्यासाठी या तिघांना बोलावण्यात आले.

पहिल्या तरुणाने मोठमोठ्या शास्त्रांचा आधार देत आपले मत मांडले.

दुसऱ्याने तर्क आणि वादाने आपले मत सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.

तिसरा तरुण मात्र शांतपणे परिस्थिती समजून घेत होता. त्याने नम्रतेने सर्वांचे म्हणणे ऐकले आणि शेवटी अत्यंत साध्या शब्दांत योग्य निर्णय सांगितला. सर्वांना त्याचा निर्णय योग्य वाटला.

तेव्हा प्रश्न उभा राहिला - खरा विद्वान कोण?

वेताळाने राजा विक्रमाला विचारले.

राजा विक्रम म्हणाला - "जो आपल्या ज्ञानाचा गर्व करत नाही आणि नम्रतेने सत्य सांगतो, तोच खरा विद्वान." क्रमश :.....

# संघ शताब्दीत पश्चिम महाराष्ट्रात दहा लाखांहून अधिक कुटुंबाशी संवाद

## समाजातर्फे आयोजित तीन हजार सकल हिंदू संमेलनांचे संघाचाही सहभाग

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विस्तार म्हणजे संघ आणि समाज यांनी एकरूप होऊन राष्ट्रकार्यासाठी सज्ज होणे याच उद्दिष्टाने संघ शताब्दीनिमित्ताने देश व राज्यभरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. पश्चिम महाराष्ट्रात ७ शासकीय जिल्ह्यांमधून समाजातील विविध संस्था- संघटनांतर्फे तीन हजारांहून अधिक सकल हिंदू संमेलनांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात १२ लाख नागरिकांसह संघ स्वयंसेवक- कार्यकर्ते सहभागी होत आहेत. तसेच मागील महिन्यात शताब्दीनिमित्ताने झालेल्या गृहसंवाद अभियानात १० लाख ८५ हजारांहून अधिक कुटुंबापर्यंत स्वयंसेवक पोहोचले. त्यांनी कुटुबांतील सदस्यांशी पंचपरिवर्तनाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. अशी माहिती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. सुरेश (नाना) जाधव यांनी दिली.

संघ आणि समाजातील दुवा अधिक घट्ट करण्यासाठी एप्रिल अखेरपर्यंत प्रांतभरात तीन हजार तर पुणे महानगरात ४५० सकल हिंदू संमेलनाचे आयोजन होणार आहेत, असेही प्रा. जाधव यांनी सांगितले.

गृहसंवाद अभियानात पश्चिम महाराष्ट्र प्रांतात संघदृष्ट्या असलेल्या २४ जिल्ह्यात १० लाख ८५ हजार कुटुंबापर्यंत पोहोचण्यासाठी ४५ हजारांहून अधिक संघ स्वयंसेवक- कार्यकर्ते सहभागी झाले. तर या अभियानाचा भाग असलेल्या पुणे महानगरात ५५ नगरातील ५१२ वस्त्यांमधून ३ लाख ४९ हजार ५३ घरांपर्यंत स्वयंसेवक पोहचले व प्रत्यक्ष संवाद साधला. त्यात १० हजार ८७९ स्वयंसेवक कार्यकर्ते सहभागी झाले होते. अशी माहिती जाधव यांनी दिली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय प्रतिनिधी सभा दि. १३ ते १५ मार्च २०२६ दरम्यान हरियाणा येथे झाली. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या प्रतिनिधी सभेमध्ये देशभरातून १४३८ प्रतिनिधी सहभागी झाले होते. प्रतिनिधी सभा आणि संघाची पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील कार्याची सद्य:स्थिती संबंधाने सोमवारी (१६ मार्च २६) आयोजित पत्रकार परिषदेत रा. स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक प्रा. सुरेश (नाना) जाधव यांनी माहिती दिली. यावेळी पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, पुणे महानगर कार्यवाह सचिन भोसले, विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी उपस्थित होते.

संघाचा विस्तार केवळ शाखांपुरता मर्यादित न राहता, तो समाजाच्या अखेरच्या घटकापर्यंत पोहोचून समाजकार्यात विरघळून जावा, हा या सकल हिंदू संमेलनांच्या आयोजनाचा मुख्य हेतू आहे. या संमेलनांच्या माध्यमातून सकल हिंदू



समाजातील विविध जाती-जमाती, पंथ आणि घटकांना एकत्र आणून समरस आणि संघटित समाज निर्मितीचा प्रयत्न केला जाणार आहे. पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या नियोजनानुसार, एप्रिल अखेरपर्यंत प्रांतातील गाव, वस्ती आणि नगर स्तरावर ही सकल हिंदू संमेलने होणार आहेत. यामध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक एकता आणि सेवा कार्यावर विशेष भर दिला जाणार असून, हजारो स्वयंसेवक आणि नागरिक या उपक्रमात सक्रिय सहभागी होत आहेत.

प्रतिनिधी सभेबद्दल अधिक माहिती देताना प्रांत संघचालक प्रा. नानासाहेब जाधव यांनी सांगितले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची तीन दिवसीय अखिल भारतीय प्रतिनिधी सभा, संघटन कार्याचा विस्तार, राष्ट्रहितासाठी समाजातील सज्जन शक्तीची अधिक सक्रियता आणि सामाजिक समरसतेच्या संकल्पासह पार पडली. गेल्या वर्षभरात संघटन कार्यात लक्षणीय वाढ झाली आहे. देशभरात संघाच्या शाखांमध्ये सुमारे ६ हजारांची भर पडली असून त्या ८८ हजारांहून अधिक झाल्या आहेत, तर शाखांची ठिकाणे ५५ हजारांपेक्षा जास्त झाली आहेत. यासोबतच साप्ताहिक मिलन आणि संघमंडळींच्या संख्येतही वाढ झाली आहे. संघटन कार्याचा हा विस्तार केवळ आकड्यांपुरता मर्यादित नसून अंदमान, अरुणाचल प्रदेश, लेह आणि दुर्गम जनजातीय क्षेत्रांतही संघाच्या शाखा कार्यरत आहेत, हे महत्त्वाचे आहे. संघ शताब्दी वर्षाच्या कार्यक्रमांमध्ये हा संघटनात्मक विस्तार स्पष्टपणे दिसून येत आहे.

डॉ. दबडघाव म्हणाले, ''संघटनात्मक विस्तारासोबतच संघ समाजात गुणवत्ता वाढविण्यासाठी निरंतर कार्य करत आहे. पंच परिवर्तनाच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक बदलासाठी प्रेरित करणे महत्त्वाचे आहे. भारतीयत्व किंवा हिंदुत्व हा केवळ एक विचार नसून ती एक जीवनशैली आहे आणि त्या माध्यमातून समाजात गुणवत्तेचा विस्तार व्हायला हवा. याच उद्देशाने समाजातील सज्जनशक्तीला एकत्र करणे आणि या विधायक शक्तीचा राष्ट्रहितासाठी उपयोग होणे आवश्यक आहे.''

एकूण आकडेवारीनुसार, देशात गेल्या वर्षी ५१,७४० ठिकाणी ८३,१२९ शाखा कार्यरत होत्या, त्या आता वाढून ५५,६८३ ठिकाणी ८८,९४९ शाखा झाल्या आहेत. अशा प्रकारे एका वर्षात ३,९४३ नवीन ठिकाणे जोडली गेली असून शाखांच्या संख्येत ५,८२० ने वाढ झाली आहे.

**संघ कार्याची पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील आकडेवारी**

नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर या सात शासकीय जिल्ह्यांना पश्चिम महाराष्ट्र प्रांत म्हणून ओळखले जाते. सर्वच तालुका आणि उपखंड स्तरावर संघाचे कार्य पोहचलेले आहे. या विस्तारात पश्चिम महाराष्ट्र प्रांतात १९८ ठिकाणी ७७६, शाखा ३०७ ठिकाणी ७०५ साप्ताहिक मिलने व २६० ठिकाणी २८४ संघमंडळी असा विस्तार आहे. तर सेवाभारती आणि रा.स्व. संघाच्या विविध संस्थांच्या वतीने १७ प्रकारची ८०० हून अधिक सेवा कार्ये प्रांतात सुरु आहेत.असेही डॉ. दबडघाव यांनी सांगितले.

**कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग**

संघ स्वयंसेवकांच्या सर्वांगीण विकासासाठी वर्षभरात विविध प्रशिक्षण वर्गांचे आयोजन होते. पश्चिम महाराष्ट्र प्रांतात मागील वर्षभरात ९८५ संघ कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. ज्यामध्ये १२ प्राथमिक वर्गांमधून ५४३ कार्यकर्त्यांना प्रशिक्षण मिळाले. तर दोन संघ शिक्षा वर्गांतून ४४२ कार्यकर्ते प्रशिक्षित झाले. यावर्षी एप्रिल आणि मे महिन्यातही संघ शिक्षा वर्गांचे नियोजन करण्यात आले आहे. साधारणपणे प्रांतातील १,५०० कार्यकर्ते वर्षभरात विविध प्रशिक्षण वर्गात सहभागी होतात.

**प्रस्तावित संघ प्रशिक्षण वर्ग**

सोलापूर येथे १५ मे ते ३१ मे दरम्यान संघ शिक्षा वर्ग (सामान्य) तर नागपूर येथे याच कालावधीत संघ शिक्षा वर्ग विशेष होईल. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी पुणे परिसरात १९ जून ते ५ जुलै दरम्यान संघ शिक्षा वर्ग प्रस्तावित आहे. जळगाव येथे १० मे ते ३१ मे कालावधीत कार्यकर्ता विकास वर्ग १ होणार आहे. अखिल भारतीय स्तरावर होणारा कार्यकर्ता विकास वर्ग २ हा नेहमीप्रमाणे नागपुरात १० मे ते ५ जून या कालावधीत पार पडेल,या वर्गाला सरसंघचालक उपस्थित असतात.

प्रतिनिधी सभेत संत शिरोमणी सद्गुरु श्री रविदासजी यांच्या ६५० व्या प्रकट वर्षाच्या निमित्ताने त्यांना आदरांजली वाहण्यात आली. संत शिरोमणी रविदासजी यांनी सामाजिक कुप्रथा आणि विषमतेविरुद्ध लढा देत समरस समाज घडवला. त्यांनी श्रमाची प्रतिष्ठा, सदाचार आणि जातीभेदाचा त्याग यावर भर दिला. परकीय आक्रमकांच्या काळात स्वधर्माचे रक्षण करत त्यांनी मीराबाईंसारख्या अनेकांना प्रेरित केले. त्यांचे जीवनकार्य आजही विभाजनकारी शक्तींविरुद्ध राष्ट्रीय एकात्मतेसाठी अत्यंत मार्गदर्शक आणि प्रेरणादायी आहे. असे प्रतिपादन प्रतिनिधी सभेत निवेदनाद्वारे केले आहे .

प्रतिनिधी सभेत गेल्या वर्षभरात निधन झालेल्या विविध मान्यवरांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यात पू. दुर्गानंद गिरी महाराज, उपमुख्यमंत्री अजित पवार, डॉक्टर अशोक मोडक, वसंत देवधर, यशवंतराव लेले, श्रीमती शालिनीताई पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील - उल्लेखनीय उपक्रम

- २ जानेवारी १९४० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कराड येथील भवानी सायं शाखेला भेट दिली होती. या ऐतिहासिक प्रसंगाचे स्मरण म्हणून यावर्षी प्रांतातील १२ जिल्ह्यांमध्येबंधुता परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेमध्ये २७३६ बंधू सहभागी झाले होते.
- समाजाभिमुख उपक्रमात पुणे महानगरातील सिंहगड भागात पॉलिथीन मुक्त मंदिर क्षेत्र अभियानांतर्गत पर्यावरणपूरक आषाढी एकादशी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचीन श्री क्षेत्र विठ्ठलवाडी मंदिर परिसरात आषाढी एकादशीला पॉलिथीन आणि थर्माकोल कचऱ्याची समस्या निर्माण होऊ नये, यासाठी मागील तीन वर्षांपासून कागदी पिशव्यांच्या वापराला प्रोत्साहन देण्याचा निरंतर पुढाकार घेतला जात आहे. मंदिर न्यास, पुणे महानगरपालिका, पोलीस विभाग आणि स्वयंसेवकांच्या समन्वयाने यासाठी योजना आखण्यात आली. विविध शाळा, सामाजिक संस्था आणि नागरिकांच्या सहकार्याने ११ हजार पेक्षा अधिक कागदी पिशव्या तयार करून त्यांचे वाटप करण्यात आले. एकादशीच्या दिवशी सकाळी ७ ते रात्री ८ वाजेपर्यंत स्वयंसेवकांनी फूल विक्रेते आणि भाविकांना मोफत कागदी पिशव्या उपलब्ध करून दिल्या.
- संघटनात्मक कार्यक्रमात पुण्यातील सिंहगड भागात संस्कृत सुभाषित स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सिंहगड भागातील बारा शाखांनी त्यात सहभाग घेतला. तसेच मानचित्र परिचयाचे एकूण ४९ कार्यक्रम झाले.

---

# सौ.मानसी म्हसकर : प्रतिभा संपन्न साहित्यिका

**ज्योतिर्मय साहित्य**

ओळख साहित्यिकांची या सदरात आपण आज सौ. मानसी प्रदीप म्हसकर हिची ओळख करून घेणार आहोत.

कशी वेल्हाळ वेल्हाळ
अगदी हवीशी हवीशी
साऱ्या सख्या सजणींचे
मन मानसी मानसी....

अशीच काहीशी माझी मैत्रीण सौ मानसी म्हसकर.

मी, गिरीशजी व परिवार आम्ही मागच्या डिसेंबर महिन्यात गुजरात ट्रीपला गेलो होतो.

तेव्हा तिथे वडोदरा येथे पहिल्यांदाच मानसी आणि तिचे मिस्टर प्रदीप भाऊजी, साहित्यिक सौ

विभावरी लेले ताई. खास आम्हाला भेटण्यासाठी आम्ही ज्या हॉटेल मध्ये थांबलो होतो, तेथे वेळ काढून आले. येताना ती मला छानशी भेट आणायला विसरली नाही.

एक साहित्यिक दुसऱ्या साहित्यिकाला भेटण्यासाठी कुठल्या प्रांताचे बंधन येत नाही. आमच्या मनसोक्त गप्पा झाल्या... जसे काही या पूर्वी बऱ्याच वेळा आम्ही भेटलो आहोत असे वाटत होतं. दोन तासांत अनेक विषया वर गप्पा झाल्या. खरंतर आम्ही महाराष्ट्रातील तर सौ. मानसीताई गुजरात मधील, पण व्हॉटस् व लिखाणामुळे व एकमेकांस भेटण्याची जी ओढ निर्माण होते, त्याचे हे फलित आणिआमची प्रथमच भेट झाली.





तसे व्हॉटसअप वर नेहमी बोलणे व्हायचे. पण पहिल्या भेटीतच मानसीच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू मला उलगडले. अहं अगदी अष्टपैलू व्यक्तिमत्व असेच म्हणावे लागेल.अतिशय गोड लाघवी प्रेमळ अशी गोड मैत्रीण.एका भाषेत नव्हे तर तब्बल तीन तीन भाषेत,म्हणजे मराठी हिंदी व गुजराथी भाषेत

कविता लिहिते, गझल सुद्धा अतिशय सुंदर पद्धतीने करते. साहित्यातील बृहस्पतीच म्हणावे लागेल.

मानसी एक जिद्दी, मेहनती, ईश्वरावर प्रचंड श्रद्धा असणारी, खूप सकारात्मक असणारी माझी मैत्रीण. मी तिला जेव्हा भेटले तेव्हा तिच्या पायाला काहीतरी त्रास होत होता असे जाणवले.



मी मानसीला विचारले, अगं, मानसी पायाला काही झाले आहे. अगं काही विशेष नाही.... काल मी आणि माझा मुलगा गिरनारला गेलो होतो, आज संध्याकाळी सहा वाजता घरी आलो.

हो हो तेच ते... जिथे गिरनार पर्वत चढताना दहा हजार पायऱ्या आहेत.

अरे बापरे एवढ्या दहा हजार पायऱ्या चढून आणि पुन्हा उतरून आली.आणि रात्री नऊ वाजता. पुन्हा आम्हाला भेटायला हॉटेल मधे दत्त म्हणून हजर!!!

पाय प्रचंड दुखत होते, ठणकत होते. पायाला केवढे गोळे आलेले... आणि तशी लंगडत ती आम्हाला भेटायला आली. मला खरच खूप खूप कौतुक वाटलं मानसीचे.स्वतःला एवढा त्रास होता तरीही आवर्जून आम्हांला भेटायला आली.

मानसी नावाप्रमाणे पवित्र, निर्मळ मनाचीआहे. आणि तसेच तिचे साहित्य ही आहे.

तिचा शुभंकर नावाचा काव्य संग्रह प्रकाशित झाला आहे. आणि तिच्या कथा, हा कथा संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. तिच्या एकंदरीत ३०० च्यावर कविता आहेत.

**(क्रमशः)**

---

# पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सागर सूर्यवंशी

**ज्योतिर्मय साहित्य**

पिंपरी : अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, जिल्हा अध्यक्ष सुनील लोणकर, राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशी या सर्व मान्यवरांच्या मार्गदर्शक सूचना आणि निरीक्षणाने परिषदेच्या पुणे जिल्हा अध्यक्षांच्या सहीने अधिकृत पत्राद्वारे सागर गोपाळ सूर्यवंशी यांची पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे नुकतेच जाहीर करण्यात आले. तसेच संस्थापक आणि माजी अध्यक्ष अनिल वडघुले यांची अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यकारिणी सदस्यपदी बढती करण्यात आली. सोमवार दि. १६ मार्च रोजी पिंपरी येथे झालेल्या अभिनंदन बैठकीत दोन्ही नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून उपस्थितांनी आपली मनोगते व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.



यावेळी पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशी, जिल्हा संघटक चिराग फुलसुंदर, जिल्हा समन्वयक मारुती बानेवार, डिजिटल मिडिया परिषद पिंपरी चिंचवड अध्यक्ष विनय सोनवणे, उपाध्यक्ष संतोष गोतावळे, अशोक कोकणे, महावीर जाधव, सिद्धार्थ चौधरी, हनुमंत रामदासी, नरेश जीनवाल, माऊली भोसले, रमेश साठे, पराग डिंगणकर, मार्गदर्शक ज्येष्ठ पत्रकार प्रकाश जमाले, ज्येष्ठ पत्रकार विजय न्यायाधीश, विकास रामटेके या उपस्थित सर्व मान्यवर पत्रकारांनी आपल्या मनोगतात नवनिर्वाचित दोन्ही पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.



















# पंचकन्या

## (प्रातः स्मरणीय अहल्या, आदर्श चरित्र)

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


रामायण तथा महाभारत हमारे शाश्वत महाकाव्य हैं। महाभारत के विस्तृत और असीम विषयवस्तु के बारे में किसने क्या खूब कहा है, ''जो इस जगत में है वह महाभारत में है और जो महाभारत में नहीं है वह इस जगत में भी नहीं है!'' इसको महर्षी व्यास की असीम प्रतिभा मानकर हम नतमस्तक होते हैं! इसी सिलसिले में हम इन पांच कन्याओं के नाम ध्यानपूर्वक देखें तो इनमें द्रौपदी महाभारत से तथा अन्य चार रामायण के पात्र के रूप में हमारे सामने आती हैं! आईए, हम रामायण में वर्णित चार पंचकन्याओं के बारे में पहले चर्चा करेंगे।

पंच कन्याओं में पहली कन्या है अहल्या, ब्रह्मदेव की अयोनिज ((स्त्री के गर्भ में जिसने जन्म न लिया हो) कन्या और गौतम ऋषि की पत्नी! उसके जन्म के बारे में अनेक कथाएं प्रचलित हैं, एक के अनुसार उर्वशी नामक रूपगर्विता अप्सरा का गर्व हरण करने हेतु, ब्रह्मदेव ने सजीव सृष्टि की असीम सौंदर्य से परिपूर्ण स्त्री का निर्माण किया। अ+ हल् हल् यानि जोतना, अहल्या का अर्थ है, ऐसी जमीन जो जोती ना गई हो । इस शब्द का एक और अर्थ है, निर्दोष, या जिसके सौंदर्य में किंचित भी न्यून नहीं, अर्थात जो सबसे सुंदर है। जो सकल अर्थों में निर्दोष है, वहीं है यह अहल्या। उसका लालन पालन करने हेतु ब्रह्मदेव ने उसे गौतम ऋषि को सुपुर्द किया। अहल्या के यौवनावस्था में पहुँचने पर गौतम ऋषि उसे फिर ब्रह्मदेव के पास ले आए।

गौतम ऋषि ने अत्यंत ममता और संयम से अहल्या की देखभाल की थी। इसे देख अत्यंत प्रसन्न होकर ब्रम्हदेव ने गौतम ऋषि को अहल्या को अपनी पत्नी के रूप में स्वीकार करने के लिए कहा। इस प्रकार वह उससे उम्र में काफी बड़े गौतम ऋषि की पत्नी बनी। सम्पूर्णरूप से समर्पित होकर वह पत्नीधर्म का पालन कर रही थी। वाल्मीकि रामायण के बालकाण्ड (सर्ग क्र ४८) में मिथिला की ओर अग्रसर होने वाले मार्ग में वन से गुजरते हुए एक उजाड़ आश्रम को देखकर राम और लक्ष्मण महर्षि विश्वामित्र से उसके बारे में प्रश्न करते हैं। तब महर्षि उन्हें तपस्वी गौतम ऋषि और उनकी पत्नी अहल्या की कथा सुनाते हैं।

एक दिन इंद्र धरती पर विचरण कर रहे थे। तभी उन्होंने देखा कि एक आश्रम के बाहर गौतम ऋषि अपने दैनिक कार्यों में व्यस्त हैं। वहीं उनकी पतिपरायण पत्नी अहल्या पर इंद्र की नजर पड़ी। उस रूपवती स्त्री को देख इंद्र देव मोहित हो गए। अब इंद्र के मन में अहल्या को सर्वतोपरि पाने की लालसा जाग उठी। उन्होंने धीरे-धीरे गौतम ऋषि की सम्पूर्ण दिनचर्या को जान लिया। मौका पाते ही एक रात्रि के दूसरे प्रहर में वे गौतम ऋषि का छद्म वेश धारण कर उनके आश्रम के समीप आते हैं। इस कृत्य में चांद उनकी मदद करता है। वह मुर्गे का रूप धारण कर रात्रि के दो पहर में ही बांग दे देता है। गौतम ऋषि को लगता है कि भोर होने वाली है। इसलिए वे अपने दैनिक प्रभात कालीन स्नानसंध्यादि अनुष्ठान करने के लिए गोदावरी नदी के तट पर चले जाते हैं। तभी गौतम ऋषि का रूप धारण किये हुए इन्द्र आश्रम में आते हैं और अहल्या से मिलन की मांग करते हैं। अहल्या को उनके रूप पर संदेह होता है, लेकिन वह जिज्ञासावश उनका अनुरोध स्वीकार कर लेती है। इंद्र ने गौतम ऋषि का छद्म रूप धारण कर उसका उपभोग किया, इसके पश्चात अहल्या सत्य जानकर इंद्र से कहती है, ''मैं कृतज्ञ हूँ। परंतु हे देवेन्द्र, आप तुरंत यहां से चले जाइये और गौतम ऋषि से अपनी और मेरी रक्षा कीजिये।''

जैसे ही इन्द्र वहाँ से जाने लगते हैं, गौतम ऋषि वापस आ पहुँचते हैं। उनके श्राप के कारण इंद्र के वृषण का स्खलन होता है और उनके शरीर पर हजार क्षत निर्माण हो जाते हैं। अत्यंत क्रोधित हुए गौतम ऋषि अहल्या की दुराचारिणी जैसे शब्दों में



निर्भत्सना करते हैं। उसे श्राप देकर वे दण्ड देते हैं कि, वह संसार से पृथक हो जाए, वायु भक्षण कर राख की शैया पर निद्रा ले तथा पश्चाताप दग्ध हो कर घने जंगल में एकांत में कठोर तपस्या करे। अहल्या उनसे बार बार क्षमा याचना करती है। तब वे उसे कहते हैं, ''जब श्री राम इस आश्रम में पधारेंगे तब तुम उनकी सेवा भाव से आदर सत्कार करना। उसी समय श्रीराम प्रभु इस दण्ड का अंत करेंगे ।'' उन्होंने कहा कि तत्पश्चात वे उसका स्वीकार करेंगे।

यहाँ अहल्या का यथावत वर्णन किया गया है। सांसारिक स्त्री सौंदर्य के स्वर्गीय पुरुषत्व की ओर आकर्षित होने की घटना यहां देखी जा सकती है। इस घटना से पहले अहल्या को गौतम ऋषि से शतानंद नामक एक पुत्र था। फिर भी वह संभवतः अतृप्त है। संभावित परिणामों को जानते हुए भी, मोह के उस क्षण में उसने अपनी इच्छाओं का दमन नहीं किया। अपने पति द्वारा निर्धारित दण्ड को वर्षों तक वहन किया। प्रचलित जनधारणा के अनुसार श्राप के परिणामस्वरूप अहल्या शिला बन जाती है । यहाँ 'शिला' शायद समाज से पृथक एक भावनाशून्य, निश्चल और अस्तित्व विहीन व्यक्तित्व का परिचायक है। ध्यान देने योग्य बात यह है कि, इंद्र को भी श्राप तो मिला परन्तु उनका सिंहासन अबाधित रहा। इंद्र के इस प्रसंग पर किये और अन्य कई प्रमादों के कारण स्वर्ग लोक का राजा होकर भी उन्हें पूजनीय माना नहीं जाता। हम जानते हैं कि विश्वामित्र से इस कथा के ज्ञात होने पर कृपालु प्रभू रामचंद्र ने अपने चरण स्पर्श से अहल्या का उद्धार किया। इस प्रकार अहल्या की यह कहानी रामायण के कथाभाग का अभिन्न अंग बनकर हमारे समक्ष प्रस्तुत होती है।



डॉ. मीना श्रीवास्तव
पुणे. मो. 99201 67211

एक धारणा यह भी है कि इस प्रसंग के बाद गौतम ऋषि तपस्या करने हिमाचल पर्वत की कंदराओं में चले जाते हैं। अपने अभिभावकों से पृथक हुए अहल्या पुत्र शतानंद को राजा जनक की मिथिला नगरी में आश्रय प्राप्त होता है। यथा समय शतानंद जनक के राज पुरोहित बन जाते हैं। राम लक्ष्मण समेत ऋषि विश्वामित्र जब मिथिला पहुँचते हैं, तब वे शतानंद को श्री राम द्वारा उनकी माता के उद्धार के बारे बताते हैं। फिर राम-सीता विवाह के पश्चात शतानंद अपनी माता से मिलने जाते हैं और गौतम ऋषि भी अंतर्ज्ञान से यह सब जान कर आश्रम में लौट आते हैं और अहल्या का स्वीकार करते हैं।

रामायण की कुछ आवृत्तियों और कथासरित्सागर में किये वर्णन के अनुसार पुरुषसत्ताक, पारंपरिक समाज में भी अत्यंत रूपवती, ब्रह्मदेव की प्रथम कन्या, स्वयं की इच्छापूर्ति को महत्व देने वाली, स्पष्ट विचार प्रकट करने वाली और अपने प्रमाद को मान्य करते हुए पति ने दिया हुआ दंड भुगतने वाली अहल्या स्वतंत्र स्त्री है। इसलिए भारतीय परंपरा में इस स्पष्ट, ढीठ और निर्भीड स्त्री को, अ-हल्या अर्थात, ऐसी जमीन जो जोती न गई हो, कहकर निर्दोष ही माना गया।

पारंपरिक रूप से स्त्री को धरती और पुरुष को हल का प्रतीक माना गया है। यह मुक्त संस्कृति का प्रतीक माना जा सकता है। कहीं न कहीं, जानबूझकर या अनजाने में अहल्या का चारित्र्यहनन हुआ यह मानना होगा, परन्तु, उसने अपने पति की बरसों तक की हुई सेवा इस एक प्रमाद के सामने इतनी तुच्छ कैसे साबित हुई? गौतम ऋषि ने उसे क्षमा क्यों नहीं की? उसके पुत्र शतानंद से भी उसे दूर रहना पड़ा। चारित्र्य पर लगा कलंक धुलने के लिए उसे लम्बी कालावधि के लिए एकांतवास तथा तपश्चर्या के मार्ग का अनुसरण करना पड़ा! प्रिय पाठक गण, इसमें मुझे ऐसा काव्यगत न्याय प्रतीत होता है कि अहल्या प्रातःस्मरणीय सती, तथा प्रथम पंचकन्या के रूप में वंदनीय रही। पुरुषप्रधान संस्कृति में भी उसका यह स्थान प्रातः पूजनीय ही रहा है।

# महाराष्ट्र साहित्य चळवळ आता अधिक समृद्ध व्हावी.....

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



1
ज्योतिर्मय
Online Journal of Literature....
साहित्याचे विद्यापीठ
❑ भारतीय सौर दिनांक २६ फाल्गुन शके १९४७, मंगळवार दि.१७ मार्च २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

आता साहित्यिकांना जोडा

सोमण, निफाडकर, महाळंक यांचे अभिनंदन; महाराष्ट्र साहित्य परिषदेत पदांचा उलटफेर

ज्योतिर्मय साहित्य
जळगाव - महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या (मसाप) लक्षवेधी निवडणुकीत प्रमुख पदांच्या निकालात उलटफेर झाला आहे. प्रस्थापित म्हणून पदांवर बसलेल्या मिलिंद जोशी - सुनिताराजे पवार - विनोद कुळकर्णी यांचा थेट पराभव करीत अध्यक्षपदी योगेश सोमण, कार्यवाहपदी स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्षपदी प्रदीप निफाडकर हे विजयी झाले. मसाप ची निवडणूक महत्त्वाची मानली जाते कारण अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (अभामसासं) भरविण्याचा अधिकार या संस्थेकडे ...

कव्हरस्टोरी
डॉ. दिलीप तिवारी, जळगाव
मो. 95525 85088

श्री. दिलीप भाऊ (ज्येष्ठ पत्रकार डॉ. दिलीप तिवारी) यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद निवडणुकीचे केलेले विश्लेषण अत्यंत यथार्थ, सूक्ष्म आणि अप्रतिम आहे. या संपूर्ण प्रक्रियेतील अनेक बारकावे त्यांनी अत्यंत नेमकेपणाने मांडले आहेत. विशेष म्हणजे, या अनोख्या आणि ऐतिहासिक निवडणूक प्रक्रियेत त्यांनी स्वतः सक्रिय सहभाग घेतला. विशेषतः आमच्या आवाक्याबाहेरील अनेक मते त्यांनी साहित्य संवर्धन आघाडीकडे वळवली, ही बाब येथे आवर्जून नमूद केली पाहिजे.

निवडणूक अभियानाच्या काळात त्यांनी सातत्याने संपर्क ठेवत आम्हा सर्व कार्यकर्त्यांना प्रेरणा व प्रोत्साहन दिले. इतकेच नव्हे तर प्रतिस्पर्धी गटातील कार्यकर्त्यांशीही डॉ. तिवारी यांनी संवाद साधत आपली पारदर्शक भूमिका स्पष्ट केली. बदल का आवश्यक आहे? - प्रस्थापितांची हुकूमशाही पद्धत, मनमानी कारभार, स्थानिक पातळीवर (शहर व जिल्हा स्तरावर) साहित्य चळवळीला नवचैतन्य देण्याची गरज, तसेच नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे, या सारख्या अनेक मूलभूत मुद्द्यांवर त्यांनी स्पष्टपणे भूमिका मांडली. मित्र दिलीप भाऊ हे संकटाच्या आणि अडीअडचणीच्या काळात नेहमीच ठामपणे पाठीशी उभे राहणारे व्यक्तिमत्त्व आहे. आमच्या मैत्रीचे हे स्नेहबंध आज तीन दशकांहून अधिक काळ जपले गेले आहेत.

या निवडणुकीला अनावश्यकपणे वैचारिक रंग देण्याचा प्रयत्न झाला. विशेष म्हणजे, असे आरोप करत असताना विरोधी परिवर्तन आघाडीने त्यांच्या प्रचारपत्राच्या मुखपृष्ठावर मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि ना. चंद्रकांतदादा पाटील यांचे छायाचित्र प्रकाशित केले होते, हा विरोधाभासही लक्षवेधी आहे.

जळगाव येथे मी बोलाविलेल्या कार्यकर्त्यांच्या ऑनलाइन बैठकीचे रेकॉर्डिंग करून ते पुण्यातील पत्रकार परिषदेत दाखविण्यात आले आणि थेट मुख्यमंत्र्यांनाच जाब विचारण्याचा प्रयत्न करण्यात आला. वस्तुतः हा प्रकार अत्यंत बालिश आणि असंगत होता. या संदर्भातील वस्तुस्थिती दिलीप भाऊ यांनी आपल्या लेखनातून अत्यंत प्रभावीपणे अधोरेखित केली आहे.

पूर्वी या निवडणुका कशा आणि कुठे पार पडत होत्या, मतदार म्हणजे सभासद कसे नोंदवले जात होते, याबाबत सर्वसामान्य सदस्यांनाही फारशी माहिती नसायची. प्रस्थापित मंडळी आपापल्या जवळच्या व्यक्तींनाच निवडून आणण्याची पद्धत रूढ झाली होती. अनेकदा निवडणुकीनंतरच सभासदांना कळायचे की निवडणूक बिनविरोध झाली आहे. यावेळीसुद्धा जिल्हा प्रतिनिधी निवडताना चर्चेविना बिनविरोध प्रक्रिया पूर्ण करण्यात आली, हेही वास्तव आहे.

तसेच, परिषदेतून पूर्वी प्रकाशित होणारे त्रैमासिकही गेल्या अनेक वर्षांपासून बंद पडले आहे. अशा विविध मनमानी कारभारामुळे परिषद सदस्य तसेच साहित्यविश्वातील अनेकजण नाराज आणि कंटाळलेले होते. परिणामी, या वेळेस घडलेला बदल हा खऱ्या अर्थाने ऐतिहासिक ठरला आहे.

✍ **राजू नन्नवरे**
राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
अध्यक्ष : विवेकानंद प्रतिष्ठान, जळगाव

आमचे मित्र श्री. राजेश पांडे यांच्या माध्यमातून आम्ही या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेशी जोडले गेलो. त्यांनी अत्यंत सूक्ष्म नियोजन, संयम आणि परिश्रमपूर्वक हे अभियान शेवटच्या क्षणापर्यंत प्रभावीपणे पूर्ण केले. त्यांच्या या प्रयत्नांचे मनापासून अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे.

खानदेशातील शिक्षण व साहित्य क्षेत्रातील अनेक प्रमुख कार्यकर्त्यांनीही या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांनी तन, मन आणि धनाने या अभियानाला योगदान दिले, ही बाब विशेषत्वाने नमूद करावी लागेल.

आता नव्याने निवडून आलेल्या व्यवस्थापन मंडळाकडून साहित्यविश्वाला मोठ्या अपेक्षा आहेत. महाराष्ट्रातील साहित्य चळवळ अधिक व्यापक आणि समृद्ध व्हावी,.... नवोदित साहित्यिकांना तसेच प्रतिभावान विद्यार्थी-युवकांना योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळावे...., तसेच मंडळाचा कारभार अधिक पारदर्शक, लोकाभिमुख आणि सर्जनशील व्हावाया अपेक्षांसह नवनिर्वाचित मंडळाला हार्दिक शुभेच्छा!

सर्व विजयी उमेदवारांचे मनःपूर्वक अभिनंदन!

# डॉ. अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वाखाली आयएमएला नवी दिशा डीन डॉ. शिवाजी सुक्रे यांचे गौरवोद्गार

## ज्येष्ठ डॉक्टरांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे वैद्यकीय क्षेत्रात आयुष्यभर उल्लेखनीय सेवा देणाऱ्या ज्येष्ठ डॉक्टरांचा सन्मान करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला जीवनगौरव पुरस्कार समारंभ अत्यंत उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. समर्थनगर येथील आयएमए सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास शहरातील ज्येष्ठ डॉक्टर, आयएमए सदस्य, विविध वैद्यकीय संघटनांचे प्रतिनिधी आणि अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात वैद्यकीय शिक्षण, समाजसेवा आणि आरोग्यसेवा क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या तीन मान्यवर डॉक्टरांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये प्रा. डॉ. काननबाला अविनाश येळीकर, ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. दत्ता कदम आणि फॉरेन्सिक मेडिसिन क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञ प्रा. डॉ. सय्यद अब्दुस समी यांचा समावेश होता.

प्रा. डॉ. काननबाला येळीकर यांनी जवळपास चार दशके शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे प्रसूती व स्त्रीरोग विभागात सेवा दिली. त्यांनी वैद्यकीय शिक्षण, स्त्री आरोग्य आणि संशोधन या क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो वैद्यकीय विद्यार्थी घडले तसेच लाखो महिलांना आरोग्यसेवा मिळाली. त्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता म्हणूनही कार्यरत होत्या. कोविडच्या अत्यंत कठीण काळात त्यांनी धैर्याने आणि नेतृत्वाने रुग्णालयाचे व्यवस्थापन केले. स्त्री आरोग्याच्या क्षेत्रात केलेल्या त्यांच्या संशोधन कार्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून त्यांना प्रतिष्ठेचा डॉ. बी. सी. रॉय राष्ट्रीय पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. दत्ता कदम यांनी चार दशकांहून अधिक काळ बालरोग क्षेत्रात सेवा देत हजारो बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी काम केले. त्यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये नवजात शिशू उपचार सेवांची सुरुवात केली आणि अनेक गंभीर बालरुग्णांना



जीवनदान दिले. त्यांनी आयएमए आणि लायन्स क्लबच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवले, आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली आणि ग्रामीण भागातही सेवा दिली. त्यांच्या सेवेमुळे शहरातील अनेक कुटुंबांशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले आहे.

फॉरेन्सिक मेडिसिन क्षेत्रातील ज्येष्ठ तज्ज्ञ प्रा. डॉ. सय्यद अब्दुस समी यांनी वैद्यकीय शिक्षण आणि मेडिको-लीगल सेवेत दीर्घकाळ योगदान दिले आहे. त्यांनी सरकारी वैद्यकीय महाविद्यालय मुंबई, पुणे आणि औरंगाबाद येथे अध्यापन केले तसेच हजारो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी देशातील अनेक महत्त्वाच्या मेडिको-लीगल प्रकरणांमध्ये तज्ज्ञ म्हणून काम केले असून त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना इंडियन ॲकॅडमी ऑफ फॉरेन्सिक मेडिसिनची फ ेलोशिप प्रदान करण्यात आली आहे. सध्या ते एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयात प्रोफेसर एमेरिटस म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगरचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे होते. आपल्या भाषणात डॉ. सुक्रे म्हणाले की, ''इंडियन मेडिकल असोसिएशन ही केवळ डॉक्टरांची संघटना नसून समाजासाठी काम करणारी एक महत्त्वाची संस्था आहे. या वर्षी अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वाखाली आयएमएला नवी दिशा मिळाली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखा नवनवीन उपक्रम राबवत आहे आणि निश्चितच ही शाखा पुढील काळात नवीन उंची गाठेल. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.'' डॉ. शिवाजी सुक्रे यांनी आपल्या भाषणात पुढे जीवनगौरव पुरस्कार प्राप्त डॉक्टरांचे कौतुक करत सांगितले की, या तिन्ही मान्यवरांनी आयुष्यभर वैद्यकीय सेवा, वैद्यकीय शिक्षण आणि समाजकार्यात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यामुळे हजारो विद्यार्थी घडले आणि असंख्य रुग्णांना जीवनदान मिळाले. अशा व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करणे ही केवळ औपचारिकता नसून ती वैद्यकीय क्षेत्रासाठी प्रेरणादायी घटना आहे. तरुण डॉक्टरांनी त्यांच्या कार्यातून सेवा, समर्पण आणि प्रामाणिकपणा यांचे धडे घ्यावेत असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर होते. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, ''आज आपण ज्या मान्यवर डॉक्टरांचा सन्मान करत आहोत त्यांनी केवळ वैद्यकीय व्यवसाय केला नाही, तर समाजाला दिशा दिली आहे. त्यांच्या आयुष्यभराच्या सेवेमुळे वैद्यकीय क्षेत्र समृद्ध झाले आहे. तरुण डॉक्टरांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी.''

मानद सचिव डॉ. योगेश लक्कस यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सांगितले की, आयएमए ही केवळ व्यावसायिक संघटना नसून समाजाच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणारी आणि डॉक्टरांना एकत्र आणणारी महत्त्वाची संस्था आहे.

या प्रसंगी आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ. शेख मुर्तुजा, डॉ. पी. एम. दरक, डॉ. यशवंत गाडे, डॉ. उज्वला दहीफळे, डॉ. कुलदीपसिंग राऊळ आणि डॉ. सुभाष श्रॉफ हे उपस्थित होते.

पुरस्कारप्राप्त मान्यवरांच्या जीवनप्रवासाचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. प्रा. डॉ. सय्यद अब्दुस समी यांच्या जीवनगाथेचे सादरीकरण डॉ. यशवंत गाडे यांनी केले. प्रा. डॉ. काननबाला येळीकर यांच्या जीवनप्रवासाचे सादरीकरण डॉ. आसावरी टाकळकर यांनी केले. तसेच ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. दत्ता कदम यांच्या जीवनप्रवासाचे सादरीकरण डॉ. अनुपम टाकळकर यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अर्चना भांडेकर आणि डॉ. सोनाली सावजी यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. शिवाजी पोळे यांनी केले.

या कार्यक्रमाला शहरातील अनेक ज्येष्ठ डॉक्टर, आयएमए सदस्य आणि वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी उभे राहून या तिन्ही मान्यवर डॉक्टरांच्या कार्याला सलाम केला.

या कार्यक्रमामुळे आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेने आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आणि त्यांच्या कार्याचा गौरव करत नव्या पिढीला प्रेरणा दिली.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559